


## माता न तु वैरिणी....

# छिन्न, विछिन्न अवस्थेत आढळले अर्भक

### पोलिसांकडून आरोपींचा शोध सुरु

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव/ पथ्रोट (दि.15)** – नजिकच्या कापुसतळणी येथे स्त्री जातीचे अर्भक छिन्न, विछिन्न अवस्थेत आणून टाकल्याचा धक्कादायक प्रकार रविवारी(दि.16) उघडकीस आला. अनैतिक संबधातून झालेल्या गर्भधारणेनंतर हा प्रकार करण्यात आल्याची चर्चा गावभर होत



आहे. पोलिसांनी यातील अज्ञात आरोपींविरुध्द गुन्हे दाखल करुन आपल्या पोटच्या गोळ्याची वैरी झालेल्या मातेचा शोध सुरु केला आहे.

कापुसतळणी येथे रविवारी सकाळी 11 वाजता मिठ्ठू नाल्या शेजारून असलेल्या रत्नापूर रस्त्याच्या कडेला असलेल्या पुर्वीच्या श्रीमती सिंधु शेंडे यांच्या शेतातील खंडेलवाल ले आउट मध्ये पहाटे चार ते पाच च्या सुमारास अज्ञात व्यक्तीने नवजात अर्भक आणून टाकल्याचे 10 ते 11 वाजताच्या लहान मुलाना दिसुन आले. त्यानंतर येथे एकच खळबळ उडाली. सदर घटनेची माहीती पोलिस पाटील सतीश तायडे यांनी रहिमापुर पोलीसांना दिली. त्यानंतर घटनास्थळावर ठाणेदार अरबट, वैद्यकीय अधिकारी अनिता खेडकर ( प्राथमिक आरोग्य केंद्र कापुसतळणी) हजर झाले. पाहणी पंचनाम्यात सदर अर्भक स्त्री जातीचे असल्याचे उघड झाले त्यामुळे गावात अनेक तर्क लावण्यात येत आहे. अंदाजे 40 वर्षापुर्वी अंजनगाव पोलीस ठाणे हद्दीतील कापुसतळणीतील बोरगाव अंबाडा येथील मारोती मंदीराजवळ अनैतीक संबंधातुन मृत अर्भक आढळले होते. नंतर रहीमापुर पो. ठाणे हद्दीतील नाल्याकाठी तसेच बसस्थानक नजीकच्या शेतातील विहीरीत मृत अर्भक सापडले असता ही चौथी घटना उजेडात आली. प्रा. आ. केंद्र येथील गरोदर मातेच्या नोंदींचा शोध घेऊन आरोपीचा शोध घेत आहे. स्त्री भ्रूणहत्या करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी गावकऱ्यांकडून होत आहे. पुढील तपास ठाणेदार अनंत वडतकर करित आहेत.

# गाडगेनगर हद्दीतील दोन घरफोडीचे गुन्हे उघड

### आरोपीला अटक, गुन्हे शाखा युनिट क्रमांक 1 ची कामगिरी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 15)** – गुन्हे शाखा युनिट क्रमांक 1 च्या पथकाने गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील घरफोडीच्या गुन्ह्यात एका आरोपीला अटक केली असून, दोन गुन्हे उघडकीस आणले आहे. अभिषेक आनंदीलाल साहू (वय 22 वर्ष रा. संतोषी नगर, साहूबाग जवळ, अमरावती) असे आरोपीचे नाव आहे. 14 फेब्रुवारी रोजी सायंकाळनंतर ही कारवाई करण्यात आली. आरोपीला पुढील तपासकरिता गाडगेनगर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

14 फेब्रुवारी रोजी गजानन जनार्धन मस्के (रा.चांगापूर) व ऋषिकेश धनराज शर्मा (वय 30, रा. चांगापूर) यांच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुध्द घरफोडीच्या कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला होता. या गुन्ह्याचा संमातर तपास गुन्हे शाखा युनिट क्रमांक 1 करित होते. दरम्यान युनिट 1 च्या पोलिसांनी घटनास्थळाजवळील सिसीटीव्ही फुटेजची पाहणी केली आणि गुप्त माहितीवरून रेकॉर्डवरील गुन्हेगार अभिषेक आनंदीलाल साहू हा आरोपी असल्याचे निष्पन्न केले. त्यानंतर पोलिसांनी आरोपी अभिषेक साहू याला त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याची चौकशी केली असता, त्याने दोन्ही गुन्हे त्याचा मित्र विशाल कराळे (रा. झाडपीपूरा, रतनगंज, अमरावती) याच्यासोबत मोपेड गाडीने केल्याचे सांगितले आहे. याप्रकरणात पोलिसांनी अभिषेकला अटक केली असून, त्याचा साथीदार विशाल कराळे पसार झाला आहे. त्याचा शोध पोलिस घेत आहे. अटक आरोपीला पुढील कारवाईसाठी गाडगेनगर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. सदरची कारवाई पोलीस आयुक्त नवीनचन्द्र रेड्डी, पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर, सागर पाटील, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे, अरुण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली युनिट क्रं. 1 चे वरिष्ठ पोलीस निरिक्षक गोरखनाथ जाधव, सहायक पोलिस निरीक्षक मनीष वाकोडे, पोलिस उपनिरीक्षक प्रकाश झोपाटे, पोलिस हवालदार सतीष देशमुख, फिरोज खान, सचीन बहाळे, नाईक पोलीस अमंलदार नाझीमउददीन सैयद, विकास गुडदे, सचिन भोयर, सुरज चव्हाण, निखील गेडाम, चालक रोशन माहुरे, किशांर खेंगरे यानी केली आहे.

# अवैध वाळू तस्करी करणाऱ्याला कारावास ची शिक्षा

### 6 महिन्याची साधी कैद आणि 2500 रुपये दंड

**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर बाजार, (दि.15)**– आसेगाव पोलीस स्टेशन हद्दीत अवैध वाळू तस्करी प्रकरणी एका व्यक्तीला येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग जी. बी. नंदगवळे यांच्या कोर्टाने सहा महिन्यांच्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

दोषारोप पत्राप्रमाणे दि.24 नोव्हेंबर 2016 रोजी सकाळी 10ञ्30 वाजता पोलिसांना गुप्त माहिती मिळाली की टाकरखेडाङ्कआसेगाव रोडवर वाळूची बेकायदेशीर वाहतूक होत आहे.पोलीस पथकाने आसेगाव पूलाजवळ नाकाबंदी करून एक ट्रॅक्टर अडवले. चालक केतन लवहले याने सांगितले की तो वाळू वाहतूक करत आहे, मात्र त्याच्याकडे वाळू वाहतूकीचा परवाना नव्हता. त्याने हे देखील सांगितले की तो ही वाहतूक शुभम कैथवास यांच्या सांगण्यावरुन हे करत आहे. ट्रॅक्टरवर नंबर प्लेट नव्हती. पोलीसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करून पंचनामा केला आणि ट्रॅक्टर ताब्यात घेतले. साक्षीदारांच्या जबानीनुसार केतन लवहले हा वाळू वाहतूक करताना आढळला.मात्र, शुभम कैथवास याच्या विरोधात ठोस पुरावे मिळाले नाहीत. पोलिसांनी या प्रकरणी केतन अशोक राव लवहले (वय 22, मजूर) व शुभम गणेश कैथवास (वय 22, शेतकरी) दोघांवर विना परवानगी वाळू वाहतूक प्रकरणी भा.दं.वि. कलम 379 सह 34 आणि पर्यावरण संरक्षण कायदा 9/15) अंतर्गत गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली होती. दोन्ही पक्षाकडून कोर्टात युक्तीवाद झाल्यानंतर सबळ पुराव्यावरुन या प्रकरणी न्यायालयाने 11 फेब्रुवारी 2025 रोजी निर्णय देत आरोपी केतन लवहले दोषी ठरविले. त्याला 6 महिन्यांची साधी कैद आणि 2,500 दंड ठोठावण्यात आला. दंड न भरल्यास 1 महिन्याची अधिक कैद भोगावी लागेल. तर शुभम कैथवास याची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करण्यात आली.

# प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेचे कामांत भ्रष्टाचार?

**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा (दि.15)**– परतवाडा ते अमरावती मार्गावरील अचलपूर तहसील अंतर्गत विदर्भ मील स्टॉप ते नारायणपूर गावात जाणाऱ्या रस्त्याचे काम प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या माध्यमातून झाले आहे. परंतु या ठिकाणी वास्तव्यास असलेल्या नागरिकांचे म्हणणे आहे की हे काम निकृष्ट दर्जाचे झाले आहे.





हा रस्ता खुप दिवसांपासुन बांधकामाच्या प्रतिक्षेत होता. परतवाडा शहराच्या लगत असलेल्या देवमाळी ग्रामपंचायत हद्दीतून हा रस्ता जात असला तरी या रस्त्याच्या दोन्ही बाजूस निवासी वस्ती असुन प्रचंड प्रमाणात रहदारी असते. ब-याच वर्षापासून दुरूस्ती व बांधकाम न झाल्याने या रस्त्यावर मोठाले खड्डे पडले होते व पावसाळ्यात तर काही ठिकाणी रस्त्यावर अपघातही झाले होते. या रस्त्यावर अनेक ले आऊट असून बांधकाम साहित्याचे वजनदार वाहने रोज येत जात असतात. देवमाळी ग्रामपंचायत भागातील व नारायणपूर गावाच्या नागरिकांना तसेच नारायणपूर शेत शिवारातील शेतकऱ्यांना जाण्या येण्याचा हा एकमेव पर्याय आहे. असे असताना सध्या या रस्त्याचे व यालाच जोड रस्ता असलेल्या फातिमा कान्हवेंट च्या मागच्या बाजूने जाणा- या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले आहे, नागरिकांच्या तक्रारीनुसार इस्टिमेट नूसार कामं झाले नसुन डांबराच्या ठिकाणी काळ्या रंगाचे आईल चा वापर केला आहे. त्यामुळे रस्ता लवकरच खराब झाला आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी अमरावती यांच्या कडे तक्रार दाखल करून या रस्त्याचे डांबरीकरण योग्य प्रकारे होत आहे का याची चौकशी करून त्वरित संबंधित अभियंता यांनी सदर रस्त्याचे स्थळ निरीक्षण करून कंत्राटदारा वर कायदेशीर कारवाई करण्यात यावी व त्यांचे सदर रस्त्याच्या कामाचे देयक थांबवण्यात यावें अशी मागणी येथील नागरिकांनी केली आहे. तसेच पुर्ण रस्ता नव्याने बांधण्यात यावा अशी मागणी केली आहे. तक्रार दाखल करताना या रस्त्याचे आजुबाजुला राहणाऱ्या असंख्य नागरिकांनीही तक्रारी वर आपल्या स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

### ट्रॅव्हल्समधील वाहकाचा मोबाईल लंपास

**अमरावती** – ट्रॅव्हल्सच्या कंडक्टरचा मोबाईल चोराने लंपास केल्याची घटना पावर हाऊस स्थित वेलकम पाईन्टवर घडली. या घटनेची तक्रार निलेश शिवदास उईके (32, रा. चिंचोरी गवळी, ता. मोर्शी) यांनी 14 फेब्रुवारी रोजी गाडगेनगर पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी विशाल धुळधुळे (32, रा. हनुमाननगर, खोलापुरी गेट) याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

# दिव्यांगाना मिळणार एक तास अतिरिक्त वेळ




### सीबीएसई दहावी, बारावीच्या परीक्षार्थीना 15 मिनिटे आधी प्रश्नपत्रिका

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 15)** – केंद्रिय माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या दहावी-बारावीच्या लेखी परीक्षांना शनिवारपासून (दि.15) सुरूवात झाली आहे. शनिवारी दहावीचा इंग्रजीचा पेपर घेण्यात आला. यंदा जिल्ह्यात दहावी व बारावीचे मिळून 3 हजारांच्या वर विद्यार्थी या परीक्षेला प्रविष्ट झाले आहेत. दरम्यान, या वर्षी राज्य मंडळाप्रमाणे सीबीएसई बोर्डाकडून देखील परीक्षार्थींना 15 मिनिटे आधी प्रश्नपत्रिका मिळत आहे. सकाळी 10.30 ते 1.30 अशी पेपरची वेळ आहे. यात विद्यार्थ्यांना 9.30 वाजता परीक्षा केंद्रांवर पोहोचावे लागत आहे. सकाळी 10 वाजता त्यांना परीक्षागृहात सोडले जाईल. कॉपी रोखण्यासाठी विविध स्कॉडची व्यवस्था करण्यात आली आहे. दिव्यांग, दृष्टीबाधित विद्यार्थ्यांना 1 तास अतिरिक्त वेळ देण्यात आल्याने त्यांचा पेपर 2.30 वाजता संपेल. यंदा राज्य मंडळाप्रमाणे सीबीएसई बोर्डाच्या परीक्षा देखील 10 ते 15 दिवस आधीच घेण्यात येत आहे. तर आतापर्यंत चित्रकला, संगीत या विषयाचे पेपर आधी होत असे. यंदा मात्र इंग्रजी, इतर भाषा आणि महत्त्वाचे विषय आधी होत आहेत. या परीक्षेसाठी देण्यात आलेले सर्व नियम विद्यार्थ्यांनी पाळणे अनिवार्य आहे. यात ज्या विद्यार्थ्यांना मधुमेह, उच्च रक्तदाब आदी आजार आहेत त्यांनी आधीच शाळांना माहिती दिली आहे. त्यांच्या हॉलतिकीटावर तशी नोंद करण्यात आली आहे, अशा विद्यार्थ्यांना परीक्षागृहात औषधी, आहार आणण्यास परवानगी देण्यात आली आहे. कॉपी रोखण्यासाठी डिजीटल वॉच वापरण्यास मनाई आहे. तसेच विद्यार्थ्यांनी पारदर्शक पॅड, पाऊच व पाण्याची बाटली आणावी. हे साहित्य पारदर्शक नसल्यास परीक्षागृहात नेता येणार नाही. उत्तरपत्रिका सोडवताना केवळ निळा व काळ्या शाईचा पेन वापरायचा आहे.

# केशव कॉलनीतील वाईन शॉपीला आग

### लाखोंचा माल जळून खाक ◆ 40 मिनीटांत आगीवर नियंत्रण

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 15)** – गर्ल हायस्कुल चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय मार्गावर असणार्या केशव कॉलनी स्थित आनंद लिंकर वाईन शॉपीला 15 फेब्रुवारी रोजी दुपारच्या सुमारास अचानक आग लागल्याने खळबळ उडाली होती. अग्निशमन विभागाच्या पाण्याच्या बंबांनी 40 मिनीटात आगीवर नियंत्रण मिळविले. परंतू या आगीत वाईन शॉपीतील मद्यासह फर्निचर व आदी साहित्य असा लाखोंचा मुद्देमाल जळून खाक झाला आहे.

शहरातील भांबोरे नामक व्यवसायीक यांचे केशव कॉलनीत आनंद लिकर वाईन शॉप नामक प्रतिष्ठान आहे. 15 फेब्रुवारी रोजी दुपारी 1.18 वाजताच्या सुमारास आनंद वाईन शॉपीला आग लागल्याचे माहिती अभय भांबोरे यांनी अग्निशमनला दिली होती. या माहितीवरून पाळी प्रमुख विलासराव उमेकर यांच्या आदेशानुसार वाहन क्रमांक एमएच 27 बीएक्स 7202 घेऊन वाहन चालक मोहम्मद फरहान, फायरमन अमोल साळुंके, योगेश साबळे घटनास्थळी रवाना झाले. त्यांनी घटनास्थळी पोहोचल्यावर तात्काळ आगीवर नियंत्रण






मिळविण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यानंतर अर्धातासानंतर आग आटोक्यात आली. या आगीत बिअर बॉटल, दारूच्या बॉटल कुलर, फ्रिज इत्यादी साहित्याचे नुकसान झाले.

सुदैवाने आगीत बिअर बारमधील संपूर्ण बियर बार वाचवण्यात यश आले. ही कार्यवाही केंद्रप्रमुख प्रेमानंद सोनकांबळे, फायरमन निखिल भाटे, वाहन चालक सतीश वेताळकर, फायरमन अमोल साळुंके, निखिल बाटे, योगेश साबळे यांनीही आग विझविण्यासाठी प्रयत्न केले. सुदैवाने या घटनेत कुठलीही जीवित हानी व जखमी झालेला नाही. आगीचे कारण अद्याप पर्यंत समजले नाही.

# ग्रामसेवक शहरात, गावाचा विकास भकास

### मुख्यालयाचे वावडे | सर्व ग्रामपंचायतीचे विदारक वास्तव


**नितीन दुर्बुडे**

**पथ्रोट (दि. 15)** – सरपंच यांच्यातील विकासात्मक दुवा समजाला जातो. मात्र, पंचायत समितींतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायतीमधील एकही ग्रामसेवक मुख्यालयी राहत नसल्याने गाव विकासाला खीळ बसली आहे. बरेचशे ग्रामसेवक तालुक्याच्या ठिकाणावरून, तर काही ग्रामसेवक जिल्हा व लगतच्या जिल्ह्याच्या ठिकाणावरून अप-डाऊन करीत आहेत. त्यामुळे गावाचा विकास कसा होणार, असा सवाल गावकरी करीत आहेत.

ग्राम विकास अधिकारी, ग्रामसेवक गावाला पूर्णवेळ देण्यासाठी काय प्रयत्न करतात, हे मात्र कोडेच आहे. केंद्र व राज्य शासनाच्या सर्व कल्याणकारी योजना जिल्हा परिषदेमार्फत राबविल्या जातात. या सर्व योजना गावातील सर्व घटकांपर्यंत सर्वकाळ उपलब्ध होतील, असे शासनाकडून पाहिले जाते. यासाठी जिल्हा परिषदेमार्फत नियुक्त केलेल्या ग्रामसेवकांना मुख्यालयी राहणे बंधनकारक केले. मात्र, मुख्यालयी राहत असल्याचे खोटे दाखले सादर करीत असतात. गावपातळीवर ग्रामसेवकांना गावाच्या सर्वांगीण विकासाच्या अनुषंगाने मुख्यालयी राहणे बंधनकारक असल्याचा ग्रामविकास विभागाने धोरणात्मक निर्णय सुद्धा घेतला आहे. तरीही ग्रामसेवकाकडून शासन नियमांची पायमल्ली केली जात आहे. याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होताना दिसत आहे.

सभेलाही ग्रामसेवकांची दांडी

अचलपुर तालुक्यातील काही ग्रामसेवकांकडे अनेक ग्रामपंचायतीचा डोलारा असल्याने स्वातंत्र्य दिन,



प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन या दिवशी ध्वजारोहण कार्यक्रमाला अनुपस्थिती असते. बरेचदा ग्रामसभा व मासिक सभेला सुद्धा ग्रामसेवक दांडी मारतात. ग्रामसेवक गावात साधे फिरकूनही पाहत नसल्याने गावातील कोणता वार्ड कुठे आहे? याची साधी माहिती सुद्धा त्यांच्याकडे नसते. त्यांच्यामुळे गावातील सांडपाण्याची व्यवस्था, विजेची व्यवस्था, पाण्याची व्यवस्था यासारख्या अनेक समस्यांवर योग्य उपाययोजना करण्यात ते अपयशी ठरतात. त्यामुळे आजही अनेक गावात योग्य मूलभूत सोयीसुविधांचा अभाव आहे. ग्रामसेवक मुख्यालयी राहत नसल्याने नागरिकांचे कामे वेळेत होत नाही. अशातच एका ग्रामसेवकाकडे एकापेक्षा अनेक ग्रामपंचायतींचा प्रभार आहे. परिणामी, नागरिकांना एकाच कामासाठी अनेकवेळा हेलपाटे मारावे लागतात. याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याचे काही सरपंच, उपसरपंच व ग्रा. पं. सदस्य सांगतात. ग्रामसेवक नियमित येत नसल्याने कामासाठी ग्रामपंचायतीमध्ये पायपीट करावी लागते. शासनाने ग्रामसेवकांना गावातच मुख्यालय राहणे बंधनकारक करावे, जेणेकरून नागरिकांची कामे वेळेत होतील अशी ब?याच ग्रामस्थांची मागणी आहे. पंचायत समिती अंतर्गत कार्यरत ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी कार्यलयीन दिवसाला ग्रामपंचायतीत उपस्थित राहून ग्रामस्थांना सेवा द्यावी , नागरिकांकडून तक्रारी आल्यास तात्काळ कारवाई करण्यात येईल अशी बतावणी वरिष्ठ अधिकारी करतात.

# 40 गुन्हे दाखल असलेल्या सराईत चोराला अटक

### बडनेरा ठाणे व रेल्वे पोलिसांची कामगिरी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 15)** – बडनेरा रेल्वे पोलिस ठाण्यात तब्बल 40 गुन्हे दाखल असलेल्या एका सराईत चोराला अटक करण्यात पोलिसांना यश मिळाले आहे. नरेश समाधान भांगे (वय 44 राहणार अनकवाडी, आष्टी, भातकुली, अमरावती) असे आरोपीचे नाव आहे. बडनेरा पोलिस ठाणे व रेल्वे पोलिसांनी ही कामगिरी केली असून, आरोपीला शेगाव रेल्वे पोलीस स्टेशन येथील पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

रेल्वे स्टेशन परिसरात बाईक चोरीचे प्रमाण वाढले होते. त्यामुळे शेगाव रेल्वे पोलीस स्टेशनचे पोलिस मोटरसायकल चोरीचा गुन्हात तपास करित होते. दरम्यान पोलिसांना या गुन्ह्यातील आरोपीबाबत गुप्त माहिती मिळाली. या माहितीवरून पोलिसांनी आरोपीचा शोध घेतला, त्यानंतर पोलिसांनी आरोपी नरेश समाधान भांगेला ताब्यात घेतले. पोलिसांनी आरोपीची चौकशी केली असता, त्याने गुन्ह्याची कबुली दिली. सदर आरोपीवर खून, दरोडा, घरफोडी, मारामारी, तसेच बाईक चोरीचे अमरावती जिल्ह्यात तसेच भुसावळ,अकोला, बडनेरा रेल्वे पोलीस स्टेशनला जवळपास 40 गुन्हे दाखल आहेत. त्याला अमरावतीच्या वलगाव येथे सापळा रचून अथक प्रयत्नानंतर पकडण्यात आले. सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक डॉ. प्रियंका नारनवरे (लोहमार्ग नागपूर), अप्पर पोलीस अधीक्षक डॉ.दत्ताराम राठोड, उप विभागीय अधिकारी संतोष वाळके, पोलीस निरीक्षक विकास कानपिल्लेवार तथा स्थानिक गुन्हे शाखा, लोहमार्ग नागपूर तसेंच बडनेराचे ठाणेदार उमेश मुंढे यांच्या मार्गदर्शनात पोलीस हवालदार सागर खंडारे, निलेश अघम तसेच रेल्वे पोलीस दुरक्षेत्र अमरावती येथील पोलिस हवालदार राजेंद्र गवई, शरद जूनघरे यांच्यामार्फत करण्यात आलेली आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# गुंतवणुकीच्या नावावर पर्यवेक्षकाची 14.5 लाखांनी फसवणूक

**लोणी कृषी कार्यालयातील घटना**




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 15 ) –** लोणी येथील कृषी कार्यालयातील कृषी पर्यवेक्षकांला शेअर बाजारातील गुंतवणूकीच्या नावावर 14 लाख 5 हजार रुपयाने गंडविण्यात आले. या घटनेची तक्रार कृषी पर्यवेक्षक मंगेश रामदासपंत भांभुळकर (43, रा. नरेडी नगर, अमरावती) यांनी 14 फेब्रुवारी रोजी लोणी पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी आठ अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मंगेश भांभुळकर हे लोणी येथील कृषी कार्यालयात कृषी पर्यवेक्षक म्हणून कार्यरत आहेत. 3 मे 2024 रोजी मंगेश यांनी मोबाईलवर मोतीलाल ओसवाल कंपनीचे ॲप डाउनलोड केले. त्यानंतर शेअर्स खरेदी केले. त्यानंतर काही दिवसांनी अज्ञात व्यक्तीने मंगेश यांच्याशी फोनवरून संपर्क साधला. त्याने जास्त नफा कमावण्याच्या नावाखाली मंगेश यांना गुंतवणूक करण्यास सांगितले. त्यानंतर मंगेश यांनी 14 लाख 5 हजार रुपये गुंतविले. त्यानंतर मंगेश यांनी ही रक्कम काढण्याचा प्रयत्न केला, असता, ते पैसे काढू शकले नाही. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर, 14 फेब्रुवारी रोजी मंगेश भांभुळकर यांनी लोणी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी 8 अज्ञात व्यक्तींविरुद्ध कलम 420 अंतर्गत गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### एजन्सी देण्याच्या नावाखाली 5 लाखांनी गंडविले

नांदगाव खंडेश्वर पोलीस स्टेशन परिसरातील रहिवासी दीपाली निलेश भगत (36) यांनी फेसबुकवरील जाहिरातीच्या माध्यमातून पुण्यातील आरजेजी प्रायव्हेट लिमिटेडची एजन्सी मिळविण्यासाठी 5 लाख रुपयांची रक्कम दिली होती. परंतू त्यांना एजन्सी देण्यात आली नाही. त्यामुळे त्यांनी कंपनीशी संपर्क साधला असता, संचालक, व्यवस्थापक आणि प्रशासक एजन्सी देण्यास विलंब करत होते. पैसे देऊनही एजन्सी न मिळाल्याने आपली फसवणूक झाल्याची तक्रार दीपाली भगत यांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी याबाबतची तक्रार पोलिस ठाण्यात दाखल केली आहे. पोलिसांनी कंपनीचे भास्कर जालिधर खिल्लारी, जितेंद्र उके, देबारंजन वारंगवाडी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



*महाशिवरात्रीला पचमढी येथे भोले शंकराचे दर्शनासाठी लोखंडी काठी बाण घेऊन जाणारे मोर्शी येथील शिवभक्त.*

# गुरू रविदास समतावादी राजसत्तेचे पुरस्कर्ते- प्रा.अरुण बुंदेले



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 15 ) –** गुरू रविदासांचा राजकीय विचार महत्त्वपूर्ण आहे.त्यांना बहुजन हिताय, बहुजन सुखाय असे राजकीय नेतृत्व अपेक्षित होते.

समाजामध्ये असणारे विविध प्रश्न राजसत्तेमुळे सहज सुटू शकतात व समाज सुखी होऊ शकतो असे त्यांना वाटत होते. त्यांनी समतावादी राज्यसत्तेचे विचार मांडले.गुरू रविदासांचे हे राजकीय विचार आज आचरणात आणल्यास संपूर्ण भारत सुखी व समृद्ध होऊ शकतो. उच्च कर्माला त्यांनी महत्व दिले,असे प्रतिपादन साहित्यिक प्रा.अरुण बुंदेले यांनी केले.

ते श्री संत शिरोमणी गुरू रविदास महाराज यांच्या 627 व्या जयंती निमित्त सर्वोदय गृहनिर्माण संस्थेतर्फे सर्वोदय कॉलनीत (दि.13) आयोजित श्री संत रविदास सांस्कृतिक भवन येथे जयंती कार्यक्रमात बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष सुधाकर नासने,प्रमुख अतिथी संस्थेचे सचिव नरेंद्र गणोरकर, डॉ.संजय खडसे, प्रकाश शेलापूरकर उपस्थित होते. अध्यक्ष व प्रमुख अतिथी यांच्या हस्ते श्री संत शिरोमणी गुरू रविदास महाराज व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन व हारार्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन नरेंद्र गणोरकर तर आभार मधुकर बुंदिले यांनी मानले.याप्रसंगी प्रभाकर सावरकर, प्रा.डॉ. दिनेश रोजतकर, इंजिनियर राजेंद्र खंडारे, डॉ.तुषार गावंडे, डॉ.विजय तायडे, हवालदार दिनकर जोगे, मधुकर बुंदीले, अमोल भटकर,कृष्णा मोहोकर,रामदास इंगळे,विजय चापके, पिंजरकर व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### गुरू रविदास वैज्ञानिक संत - डॉ.संजय खडसे

संत रविदास महाराज यांनी मानवतेला एकता,समता आणि बंधुभावाचा संदेश दिला. त्यांच्या शिकवणीत जातिव्यवस्थेचा तीव्र विरोध आणि समानतेवर भर होता.त्यांचे विचार आजही मानवतेच्या एकात्मतेसाठी मार्गदर्शक ठरतात.संत रविदास महाराज यांनी धर्म,जात,लिंग या भेदांपलीकडे जाऊन समानतेची शिकवण दिली. मानवतेला प्रेम, शांतीचा मार्ग दाखविला.त्यांच्या शिकवणीचा प्रभाव केवळ भारतातच नाही तर जगभरातील अनुयायांवर दिसून येतो. गुरू रविदास जनकल्याणकारी व वैज्ञानिक संत होते, असे विचार प्रमुख अतिथी प्रा.डॉ.संजय खडसे यांनी व्यक्त केले.


# जमीन फ्री होल्ड करण्यासाठी मंगळवारपासून विशेष शिबिर

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 15 ) –** निवासी प्रयोजनार्थ लिलावाद्वारे प्रिमियम अथवा अन्यप्रकारे भाडेतत्वावर देण्यात आलेल्या जमीन फ्री होल्ड करण्यासाठी विशेष अभय योजना 2024-25 दि. 01 एप्रिल 2024 ते दि. 31 जुलै 2025 या कालावधीसाठी लागू करण्यात आली आहे. यासाठी अमरावती तहसील कार्यालयात मंगळवार, दि. 18 फेब्रुवारीपासून विशेष शिबीर आयोजित करण्यात आले आहे.अर्जदार नागरिकांनी त्यांचा अर्ज, मालमत्ता पत्रक पी-आर कार्ड, मुळ जागा मिळाल्याबाबतची कागदपत्रे, हक्कनोंदणी, सेटलमेंट, फेरफार, मुळ मालकाकडून व्यक्तींकडे सदर मालमत्ता हस्तांतरीत झाली असल्याबाबतची कागदपत्रे, खरेदीखत फेरफार, भाडेपट्टा नुतनीकरणाचे आदेश, शर्तभंग झाला असल्यास नियमानुकूल बाबतचे आदेश, जाहिरातनामा, चालू आर्थिक वर्षाचे मुल्यांकन, स्थळ निरीक्षण अहवाल आदी कागदपत्रे जोडुन अर्ज करावा लागणार आहे.यासाठी मंगळवार 18 फेब्रुवारी ते 25 फेब्रुवारी पर्यंत तहसिल कार्यालयाच्या नवीन प्रशासकीय इमारतीमधील पहिल्या माळ्यावरील हॉलमध्ये विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबीराचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी अनिल भटकर यांनी केले आहे.

# अंजनगाव बारी येथे श्रीमद भागवत कथेला प्रारंभ

**श्री गजानन महाराज मंदिरात आयोजन**



**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी, ( दि.15 )–** अंजनगाव बारी येथील आसरा नगर परिसरात असलेल्या श्री संत गजानन महाराज मंदिरात आज शुक्रवारपासून संगीतमय श्रीमद् भागवत कथेला सुरुवात झाली. हभप अभिनंदन गायकवाड सोलापूरकर हे या भागवत कथेचे मुख्य प्रवक्ते आहेत. 21 फेब्रुवारीपर्यंत भागवत कथा सप्ताहा निमित्ताने मंदिरात अन्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. आज शुक्रवारी पहाटे कलश स्थापना करून या उत्सवाला सुरुवात झाली. भागवत कथेसोबतच दररोज सकाळी 7 वाजता व दुपारी 4 वाजता बावन्नी व श्रींची आरती होणार आहे. 15 फेब्रुवारीला गुरुदेव सेवा महिला मंडळाचे व 16 फेब्रुवारीला मरीमाता महिला भजन मंडळाचे भजन आयोजित करण्यात आले आहे. 17 फेब्रुवारीला महालक्ष्मी महिला भजन मंडळ, 18 फेब्रुवारीला शारदा महिला भजन मंडळ, 19 फेब्रुवारीला मोतीशेष महिला भजन मंडळ यांच्या भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. दररोज सायंकाळी 5 वाजता गुरुदेव सेवा मंडळ व वारकरी मंडळ हनुमान मंदिर यांचा हरिपाठ होईल. सायंकाळी 6 ते 10 या कालावधीत श्रीमद् भागवत कथा प्रवचन होणार आहे. अभिनंदन गायकवाड यांच्या भागवत कथेला चंद्रकांत लोखंडे, संतोष इंगळे, आकाश पोकळे हे संगीताची साथ संगत करीत आहेत. गुरुवार 20 फेब्रुवारी रोजी दुपारी 3 वाजता गावातून ग्रंथाची शोभायात्रा काढण्यात येणार आहे. गोपाल काल्याचे किर्तन शुक्रवार 21 फेब्रुवारीला सकाळी 10 वाजता होईल. महाप्रसादाचे वितरण दुपारी 1 ते सायंकाळी 5 या वेळात करण्यात येणार आहे. या सर्व कार्यक्रमांना भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# श्री विश्वकर्मा जयंती उत्साहात

**ज्येष्ठ समाजसेवक अजाबराव खानझोडे यांच्या हस्ते महापूजा**





**महासागर प्रतिनिधी**

**कौडण्यपूर-, ( दि.15 )–** सुतार समाजाचे आराध्य दैवत प्रभू श्री विश्वकर्मा जयंती श्री क्षेत्र कौडण्यपूर येथील श्री प्रभू विश्वकर्मा सुतार समाज मंडळाच्या वतीने (दि.10) उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम सकाळी ज्येष्ठ समाजसेवक व समितीचे मार्गदर्शक अजाबराव खानझोडे तसेच मंदिर अध्यक्ष श्रीराम पुंडेकर व समितीच्या हस्ते मूर्ती अभिषेक महाआरती संपन्न झाली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते झेंडावंदन संपन्न झाले. यावेळी व्यासपीठावर सत्कारमूर्ती म्हणून संस्थेचे मार्गदर्शक अजाबराव खानझोडे, प्रमुख अतिथी नामदेवराव अंबाडकर, तर अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्रीराम पुंडेकर, अन्नदाते दिनकर बेलमकर यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी अक्षय पुंडेकर यांनी संस्थेच्या कार्याबद्दल माहिती दिली. त्यानंतर ज्येष्ठ समाजसेवक व समितीचे मार्गदर्शक अजाबराव खानझोडे यांचा समितीच्या वतीने शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच अन्नदाते दिनकर बेलमकर,समितीचे मार्गदर्शक नामदेव अंबाडकर यांचा सुद्धा सत्कार समितीच्या वतीने यावेळी करण्यात आला.

यावेळी मंदिर अध्यक्ष श्रीराम पुंडेकर यांनी प्रभू श्री विश्वकर्मा मंदिर समितीच्या आगामी विकासकामाबद्दल समाज बांधवांना माहिती दिली. तसेच यावर्षी 21 वर्षे पूर्ण झाल्याने समाजबांधवांनी आतापर्यंत केलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले. त्यानंतर समितीचे संचालक मोरेश्वरराव खेडकर यांनी मान्यवरांना सुतारपत्रिकेचे वितरण केले. त्यानंतर ह.भ.प. विठोबा बागडे व संच विकासराव बोरकर, गिरी महाराज, राऊत महाराज, मोहन थिमेट महाराज, हेरोडे महाराज यांचे काल्याचे कीर्तन संपन्न झाले. त्यानंतर सर्व समाज बांधवानी व भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष यांच्यासह सचिव उमेश अमाळकर, कोषाध्यक्ष दिनेश पुसदकर, संचालक मोरेश्वर खेडकर, भाऊराव आसेकर, रमेशराव देऊळकर, अमोल दरवळकर, मेघश्याम निरडकर, अमोल पुंडेकर, दिनेश बेलमकर, तसेच अंकुश देऊळकर, विनोद खेडकर, विकास खेडकर, बाळू अवजेकर, अंकुश पुंडेकर, स्वप्नील महाराज खेडकर, भूषण बेलमकर, प्रणय खेडकर, गणेश बेलमकर आदींनी अथक परिश्रम घेतले.

# देवानंद मेश्राम यांचे ऑलिंपिक ट्रायथलॉनमध्ये सुयश



**नेत्र दीपक कामगिरीसह पटकावले तृतीय स्थान**

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.15 )–** नागपूर येथे नुकतेच मॅइल टायगर मॅन, ट्रायथलॉन आणि ड्यूएथलॉन 2025 या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सहनशीलतेची कसोटी पाहणाऱ्या या स्पर्धेत मंडळ अधिकारी व माजी सैनिक देवानंद मेश्राम यांनी नेत्रदीपक कामगिरी करीत तिसरे स्थान पटकावले.

स्पर्धेमध्ये देशभरातील 11 राज्यांतील 375 स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता. अनेक आव्हानात्मक श्रेणींमध्ये ही स्पर्धा घेण्यात आली. ऑलिंपिक ट्रायथलॉनमध्ये देवानंद मेश्राम यांनी सहभाग घेऊन तिसऱ्या क्रमांकावर यशस्वीरित्या स्पर्धा पूर्ण केली. अंबाझरी तलावात दीड किलोमीटर पोहणे, त्यानंतर लगेच 40 किलोमीटर सायकलिंग करणे आणि शेवटी दहा किलोमीटर धावून मेश्राम यांनी हे यश प्राप्त केले. रेस डायरेक्टर डॉ. अमित समर्थ यांच्या हस्ते मेडल प्रदान करून देवानंद मेश्राम यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अजित कुमार सक्सेना प्रामुख्याने उपस्थित होते.

# राष्ट्रसंत स्मृती सोहळ्यात गायक प्रमोद पोकळे यांचा सत्कार

**भजन गायनाचा कार्यक्रमही पार पडला**



**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी, ( दि.15 )–** महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या नाशिक येथे नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय कामगार भजन स्पर्धेत राष्ट्रसंतांची भजने सादर करून प्रमोद पोकळे व संघाने दुसरा क्रमांक प्राप्त केला. या यशाद्वारे अमरावतीचा नावलौकिक वाढविल्याबद्दल प्रमोद पोकळे यांचा राष्ट्रसंतांच्या स्मृती सोहळ्यात सत्कार करण्यात आला.

मोर्शी मार्गावरील गुरुदेव प्रार्थना मंदिरात पार पडलेल्या या कार्यक्रमात अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाचे सरचिटणीस जनार्दन बोथे यांच्या हस्ते प्रमोद पोकळे यांना गौरविण्यात आले. यावेळी गणमान्य नागरिक उपस्थित होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यस्मृती व स्वर्गीय सहदेवराव तारेकर आणि लिलाबाई तारेकर पुण्यस्मरणानिमित्त या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सत्कार समारंभानंतर प्रमोद पोकळे आणि संचाचा भजन गायनाचा कार्यक्रमही पार पडला. यावेळी तारेकर परिवार व मित्र मंडळाकडून अंध-अपंग आणि गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासाठी आर्थिक मदत तसेच शिलाई मशीन, सायकल व सतरंजी आदी साहित्याचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकाश तारेकर यांनी केले. कार्यक्रमाला ज्येष्ठ समाजसेवक गोविंद कासट, कीर्तनकार लक्ष्मणदास काळे, आचार्य हरिभाऊ वेरूळकर गुरुजी, गुरुदेव सेवा मंडळाचे सर्वाधिकारी लक्ष्मणराव गमे, डॉ. विजय बोंडे, अनिल गौतम, प्रकाश तारेकर, अशोक तारेकर, अरुण टांक, राजेंद्र तारेकर, शाकीर नायक, प्रा. नवनाथ इंगोले, प्रा. जीवन गोरे, नरेंद्र तायडे, डॉ. राजेंद्र डांगे, शाम तारेकर, सुरेश तारेकर, प्रल्हाद पारिसे, विलास साबळे, नामदेव गव्हाळे, भानुदास कराळे, उंबरकर महाराज, श्रीराम तायडे, सुभाष सिंह, दिनेश कनेरकर, प्रकाश बोके, अशोक रूमने, प्रज्वल वांगे, रेणुराव सालोडकर, शाम तारेकर, बाबुराव धोटे, विनायक धुळे, श्रीधर डहाके, रामदास सदार, काशिनाथ फुटाणे, विजय माथने, बाळकृष्ण धर्माळे, बबन विधाते, प्रज्वल हिरडे, महादेव सोळंके, ओंकार ताथवडे आदी प्रामुख्याने उपस्थित होते. लक्ष्मणदास काळे महाराज यांच्या कीर्तनाने व महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली. सुरज तारेकर यांनी आभार मानले.

# येवदा चे सरपंच पदावरून अखेर पायउतार

**उपसरपंच अमानुल्ला खा यांच्याकडे नवी जबाबदारी**



**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर, ( दि.15 )–** तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत येवदा असून ग्रामपंचायतीमध्ये सरपंच पदावर मोठा बदल झाला आहे. माजी सरपंच प्रतिभा राजेंद्र माकोडे यांना विभागीय आयुक्त कार्यालयाच्या आदेशानुसार 22 जानेवारी 2025 रोजी सरपंच पदावरून अपात्र घोषित करण्यात आले होते. मात्र उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार अपात्र घोषित झाल्यापासून त्यांना तीन आठवड्याची मुदतवाढ मिळाली होती, त्यांची ही मुदत 12 फेब्रुवारीला संपल्याने ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमानुल्ला खा दिलावर खा यांना सरपंच पदाचा प्रभार (दि.14) सोपविन्यात आला आहे. त्यामुळे आता ग्रामपंचायतीच्या सर्व कारभाराची जबाबदारी त्यांच्यावर आली आहे.

येवदा ग्रामपंचायतीच्या गावठाण हद्दीतील सरकारी जमिनीचा गैरव्यवहार, पदाचा गैरवापर आणि प्रशासकीय आदेशांच्या उल्लंघनाचे आरोप माजी सरपंच प्रतिभा माकोडे यांच्यावर ठेवण्यात आले होते. शिवसेना (ठाकरे गट) चे प्रदीप वडतकर आणि ग्रामपंचायात सदस्य सुयोग टोबरे यांनी यासंदर्भात विभागीय आयुक्त कार्यालयात तक्रार दाखल केली होती. यासंदर्भात सादर केलेल्या पुराव्यांच्या आधारे महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम 1959 च्या कलम 39(1) अंतर्गत प्रतिभा माकोडे यांना सरपंच आणि सदस्य पदासाठी अपात्र घोषित करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे सरपंच प्रतिभा माकोडे यांनी 26 जानेवारी 2024 ची ग्रामसभा नियमानुसार न घेतल्याने सरपंच यांच्या विरोधात जिल्हाधिकारी अमरावती यांच्या न्यायालयामध्ये प्रदीप वडतकर यांनी अपील दाखल केलेले आहे. सदर प्रकरणात अर्जदार प्रदीप वडतकर यांची बाजू मांडण्याकरता ?ड.अरविंद गुडघे यांनी युक्तिवाद केला. सदर प्रकरण आदेशासाठी बंद करण्यात आलेले असून येत्या एक ते दोन दिवसात जिल्हाधिकारी अमरावती यांच्याकडून सदर प्रकरणाचा सुद्धा आदेश घोषित करण्यात येणार आहे.

ग्रामपंचायतीच्या या बदलांमुळे येवदा गावात मोठी चर्चा रंगली आहे. समर्थक आणि विरोधक दोन्ही गट यावर आपली प्रतिक्रिया देत आहेत. प्रतिभा माकोडे पुढे आणखी काय कायदेशीर पावले उचलणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पुढील काही दिवसांत या प्रकरणात नवीन घडामोडी होण्याची शक्यता आहे.

